**"डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज: पत्ररूप संवाद"**

**डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव,** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी. ता. गगनबावडा जि. कोल्हापूर. मो.९४२१५८६८५१ ईमेल: jadhavjj01@gmail.com

---

**सारांश:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज या दोन महामानवांचा लढा हा सामाजिक परिवर्तनासाठी होता. दोघांनी ही व्यक्तीचे नैसर्गिक हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत लढा दिला. विशेषता भारतातील जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करून सामाजिक समता आणि व्यवस्था परिवर्तनाच्या दृष्टीने कार्य केले. दोघांचा ऋणानुबंध खूप वेगळा आणि वैचारिक स्वरुपाचा होता. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणाला मदत तर केलीच पण बहुजनांचे खऱ्या अर्थाने "लोकमान्य पुढारी" असा त्यांचा गौरव केला. भविष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे निर्माते असतील असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला. या दोन महामानवांची एकमेकांशी प्रत्यक्षात भेट फार कमी झाली असली तरी सामाज परिवर्तन चळवळीच्या अनुषंगाने त्यांच्यामध्ये पत्ररुपाने झालेला संवाद हा बहुजनांच्या चळवळीची दिशा निश्चित करणारा होता.

**प्रस्तावना:**

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये फुले, शाहू, आंबेडकर हे नाव नसून ती एक विचारधारा आहे. ज्या विचारधाराने संपूर्ण देशामध्ये सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले यांनी "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" या विचारांचा लढा उभा केला. त्यांनी अस्पृश्य, शेतकरी वर्गाचे दुःख, दारिद्र्य या मागील कारणांची मिमांसा केली. तेव्हा त्यांच्या या अवस्थेला त्यांचे अज्ञान जबाबदार आहे. ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. म्हणून त्यांनी बहुजनांच्यासाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचा निर्णय घेतला. तर पुढील काळात छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या राजकीय सत्तेचा वापर सर्व सामान्य रयतेसाठी केला. त्यांनी ही बहुजनांच्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक परिवर्तनाचा लढा उभा केला. तर विसाव्या शतकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या दोन्ही महामानवांच्या कार्याला परिपूर्णता दिली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांनी या देशात लोकशाही प्रस्थापित करून सर्वांना कायद्याने एका समान पातळीवर आणले. हे तिन्ही महामानव वेगवेगळया कालखंडामध्ये आणि वेगवेगळया जातीमध्ये जन्माला आले असले तरी विचाराने आणि कार्याने एकमेकांचे वारसदार होते. विशेषत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज यांचा ऋणानुबंध खूप आगळा-वेगळा होता. सामाज परिवर्तनाच्या लढ्यामध्ये दोघांची भूमिका ही सारखीच होती. सर्वसामान्य जनतेला न्याय, हक्क आणि अधिकार मिळाले पाहिजेत. यासाठी आयुष्यभर दोघेही कार्यरत राहिले. छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट प्रसंगी होत असली तरी हे दोन महामानव एकमेकांशी पत्ररूपाने नेहमीच एकमेकांच्या संपर्कात असत. या भयंतांच्यामध्ये सामाज परिवर्तनाच्या लढाईची चर्चा होऊन चवळीची दिशा निश्चित केली जात असे.

प्रस्तुत संशोधनपर निबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज यांचा सामाजिक, धार्मिक आणि वैचारिक परिवर्तनाचा लढा आणि त्या अनुषंगाने या दोन महापुरुषांच्यामध्ये घडून आलेला संवाद यावरती प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**उद्देश:**

डॉ .बाबासाहेब आंबेडकर आणि राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्यातील सामाजिक, धार्मिक आणि वैचारिक संवाद आणि समाज परिवर्तनाची चळवळ समजावून घेणे.

**महत्त्वाचे शब्द:** अस्पृशता, चिरमैत्री,डेप्युटेशन इ.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी सामाजिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. संशोधनासाठी प्राथमिक तसेच दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची मैत्री:**

छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध हे अत्यंत जिव्हाळयाच्या स्वरूपाच्या होते. दोघेही सामाज परिवर्तनाच्या चळवळीचे खंदे पुरस्कर्ते असले तरी त्यांच्यातील मैत्री ही चिरमैत्री होती. शाहू महाराजांनी 'रमाबाईंना' आपली बहीण मानले होते. आणि आपल्या बहिणीला माहेरपणासाठी नेण्याची तयारी दाखवली होती. त्याचप्रमाणे शाहू महाराजांचे पुत्र 'राजाराम महाराज' आणि कन्या 'अक्काबाई' हे बाबासाहेबांना 'मामा' म्हणून संबोधत असत. वरील घटना या त्या दोघांच्यामधील असणाऱ्या घनिष्ठ मैत्रीची साक्ष देतात. छत्रपती शाहू महाराज सुद्धा आपल्यापेक्षा जास्त सुशिक्षित आणि अभिमानी असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव मुक्तकंठाने करत असत. आणि बाबासाहेब ही तितक्या सौजन्याने त्याचा सस्वीकार करताना दिसतात. डॉ. आंबेडकर सारख्या अस्पृश्य वर्गातील मुलांने उच्च शिक्षण घेतलेली बातमी ऐकल्यानंतर ते म्हणतात की, "आता या बामनांना बौद्धिक बाबतीत शह द्यायला बहुजन समाजातील माणसे हळूहळू पुढे येऊ लागली आहेत. एक दिवस असा येईल की, या

बामणापेक्षा आमच्या बहुजन समाजातील माणसेच पुढे गेलेली असतील."[१] डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराज यांची पहिली भेट ही दत्तोबा दळवी यांच्या सहकारातून कोल्हापूर येथे घडून आली. सुरवातीस डॉ. बाबासाहेब कोल्हापूरास येण्यास तयार नव्हते. कारण त्यांना संस्थानिकांच्या लहरीपणाचा अनुभव यापूर्वी आलेला होता. पण ज्या वेळेला दत्तोबा दळवी यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्याबद्दल आणि त्यांच्या अस्पृश्यता निर्मूलन कार्याबद्दल माहिती दिली. तेव्हा ते भेटीस येण्यासाठी तयार झाले. पहिल्याच भेटीचे घनिष्ठ मैत्रीत रूपांतर झाले. या पहिल्याच भेटीत डॉ. आंबेडकरांनी आपल्या 'मूकनायक' साप्ताहिकविषयी सविस्तर बोलून दाखवले. तसेच आपल्या साप्ताहिकाचे बोधवाक्य असणारी तुकारामांची काही वचने त्यांना वाचून दाखवली. हे ऐकून शाहू महाराज अत्यंत प्रसन्न झाले. आणि त्यांनी लगेचच 'मूकनायक' साप्ताहिकास २,५०० रुपयांची भरघोस मदत देऊन टाकली. आणि खऱ्या अर्थाने मूकनायक बोलू लागला.[२] उभयांतांच्यामध्ये फार कमी भेटी घडून आल्या. मात्र पत्ररूपाने दोघांच्यामधील संवाद हा नेहमीच सुरू राहिलेला दिसून येतो. ज्यामधून खऱ्या अर्थाने बहुजन समाजाच्या उद्धाराची चळवळ गतिमान झालेली दिसून येते.

**ऐतिहासिक माणगाव परिषद :**

या दोन महापुरुषांची २१ आणि २२ मार्च, १९२० मध्ये माणगाव परिषदेच्या निमित्ताने भेट झाली. ही भेट खरोखरच ऐतिहासिक अशी होती. माणगाव येथील परिषदेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अध्यक्ष होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून खुद्द छत्रपती शाहू महाराज आले होते. याच व्यासपीठावरून शाहू महाराजांनी बाबासाहेबांचा अस्पृश्यांचा उद्धारकर्ता आणि उद्याच्या हिंदुस्तानचा राष्ट्रीय नेता म्हणून मुक्त कंठाने गौरव केला होता. महाराजांचे हे भाकीत खरे ठरले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजक्रांतीच्या कार्याचा प्रारंभ याच परिषदेपासून झाला. त्यामुळे ही परिषद म्हणजे देशाच्या सामाज परिवर्तनाच्या वाटचालीतील एक मानबिंदू ठरली होती. या परिषदेचा वृत्तांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मूकनायक' साप्ताहिकात दिलेला आहे. अस्पृश्यांच्या या परिषदेचे आयोजन करणाऱ्या 'आप्पासाहेब दादगोंडा पाटील' या व्यक्तीवरती गावातील सवर्णांनी बहिष्कार टाकलेला होता. त्यासंदर्भात छत्रपती शाहू महाराजांनी बहिष्कार टाकणाऱ्या लोकांना बोलावून तुरुंगात टाकण्याची तंबी दिली. तेव्हा हे लोक वाटणीवर आलेले दिसतात. या परिषदेस उपस्थित राहून शाहू महाराजांनी बहिष्कृत वर्गास ऋणी करून सोडले. शाहू महाराजांनी आपल्या करवीर राज्यात बहिष्कृतांना समानतेचा हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचे कार्य सुरू केल्यामुळे त्यांचा २६ जून हा जन्मदिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा असा ठराव या परिषदेमध्ये करण्यात आलेला होता.[३]

या परिषदेत शाहू महाराज यांनी 'माझे प्रिय मित्र' असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करुन ते म्हणाले की, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला आहे. याबद्दल मी तुमचे अंतकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की, ते संपूर्ण हिंदुस्थानचे पुढारी होतील. असे माझे अंतर्मन मला सांगते आहे.[४] शाहू महाराजांनी बोललेले हे शब्द खरे ठरले. यावरून शाहू महाराजांची दूरदृष्टी आपल्या लक्षात येते. माणगाव परिषदेनंतर शाहू महाराजांनी बाबासाहेबांना स्नेहभोजनाचे निमंत्रण दिले होते. त्यानुसार रजपूतवाडी येथील 'सोनतळी' कॅम्पवर स्नेहभोजनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जरीचा फेटा बांधून त्यांचा मानसन्मान केला. त्यासंदर्भात डॉ. बाबासाहेब म्हणतात की, छत्रपतींनी जो मानाचा जरीपटका माझ्या डोक्यावरती चढविला आहे त्याचा मी सदैव मान राखीन.[५] त्यानंतर शाहू महाराजांनी स्वतः आंबेडकरांना रेल्वे टेशनवर जाऊन निरोप दिला. वरील प्रसंगावरून लक्षात येते की, एक चांगला मनुष्य चांगला मित्र होऊ शकतो.[६]

**नागपूर आणि दिल्ली येथील अखिल भारतीय बहिष्कृत परिषद:**

माणगाव परिषदेनंतर नागपूर येथील 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेच्या' निमित्ताने शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुन्हा एकदा भेट ३० मे, १९२० मध्ये घडून आली. त्यातूनच दोघांच्यामधील मैत्री अधिकच घट्ट बनत गेली. या परिषदेच्या संदर्भातील मजकूर हा दि. ७ जुन, १९२० रोजी लिहिलेल्या पत्रातून समजतो. या परिषदेचे अध्यक्ष छत्रपती शाहू महाराज हे होते. यावेळी अस्पृश्यमुक्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संस्था स्थापन करणार होते. त्या संस्थेसाठी फंड आवश्यक होता. त्या संदर्भात शाहू महाराज म्हणतात की, आपण जे डेप्युटेशन फंड गोळा करण्याकरता पाठवणार आहात त्यात माझे नाव घालण्यास मी आपणास मोठ्या आनंदाने परवानगी देतो. आपण जी काही संस्था स्थापन कराल तिचा व्हाईस प्रेसिडेंट किंवा असिस्टंट सेक्रेटरी देखील मी होण्यास तयार आहे. अशा पद्धतीची भावना त्यांनी बोलून दाखवली. तसेच 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन फंड' या नावाची आपण संस्था स्थापन करून चांगली वजनदार माणसे कामाकरीता निवडावीत. म्हणजे संस्थेच्या वतीने ठिकठिकाणी डेप्युटेशन पाठवता येतील. म्हणजे फंड गोळा करण्यास सोयीचे होईल. मला स्वतःला असिस्टंट सेक्रेटरी होण्याची फार इच्छा आहे. व मी हे काम मोठ्या आनंदाने करेन. यावरूनच बहिष्कृतवर्गाच्या चळवळीचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या नेत्यांने करावे. हीच शाहू महाराजांची मनोमन इच्छा होती याची स्पष्टता येते.[७]

याशिवाय, डॉ. आंबेडकर व शाहू महाराज हे एकमेकांचे कसे आदर करत होते याचे आणखीन एक उत्तम उदाहरण म्हणजे दिल्ली येथे १३ व १४ फेब्रुवारी, १९२२ रोजी 'अखिल भारतीय बहिष्कृत सभेची परिषद भरली होती. या सभेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अनुपस्थित होते. त्यावेळी त्यांच्या माघारी छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांच्याबद्दल प्रशंसाउदगार काढले होते. ते म्हणाले होते की, भीमराव आंबेडकर हे तुमचे महान नेते आहेत. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा. त्यांचे अनुकरण करा आणि त्यांच्यासारखे होण्याचा

प्रयत्न करा. मी तर तुमच्या सेवेला वाहून घेतले आहे. मला तुमची सेवा करू द्यावी. ही विनंती. असा हा जगावेगळा राजा आणि त्याची जगावेगळी मैत्री होती.[८]

**शिक्षणासाठी अर्थसहाय्य:**

बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीच्या जोरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबो विद्यापीठातून एम.ए. आणि पी. एच. डी. ची पदवी संपादन केली होती. तर पुढील एम. एस्सी व बार-ॲट-लॉ शिक्षणासाठी त्यांना इंग्लंडला जावयाचे होते. पण सयाजीराव गायकवाड यांच्याकडून पुढील अर्थसहाय्य न मिळाल्याने त्यांना भारतात परत यावे लागले. आणि बडोदा संस्थांनची नोकरी करण्यासाठी ते बडोद्याला गेले. पण तेथे त्यांना मिळालेल्या अस्पृश्यतेच्या वागणुकीमुळे तेथे नोकरी करणे शक्य झाले नाही. तेंव्हा ते परत मुंबईस आले. दरम्यान म्हणजेच इ. सन. १९१८ मध्ये छत्रपती शाहू महाराज यांना दलित समाजातील एका तरुणाने उच्च पदवी संपादन केली असल्याचे समजले. तेव्हा त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार उभयंतांच्यामध्ये दत्तोबा दळवी यांच्या प्रयत्नातून भेट घडून आली. त्यावेळी पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याची आपली इच्छा बाबासाहेबांनी बोलून दाखवल्यामुळे त्यासाठी शाहू महाराजांनी सर्व प्रकारचे आर्थिक सहाय्य करण्याची जबाबदारी घेतली. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्लंडला निघण्यापूर्वी शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या मुंबईतील परळमधील सिमेंटच्या चाळीत जाऊन त्यांची भेट घेतली. एवढेच नाही तर ‘रमाबाई’ ही माझी बहीण असून, तुम्ही लंडनला जाऊन परत येईपर्यंत मी तिला माहेरी कोल्हापुरी घेऊन जातो असे सांगितले होते. शाहू महाराजांच्या या उद्गारामुळे बाबासाहेबांच्या मनात त्यांच्याविषयी कमालीचा आदर निर्माण झाला. यावर बाबासाहेबांनी मी कुटुंबाची मुंबईत सर्व व्यवस्था करून जात आहे. आपण याबद्दल त्रास घेऊ नये. असे सौजन्यपूर्ण उत्तर दिले. या दोन महापुरुषांची मुंबईतील ही शेवटचीच भेट ठरली.

दि. ४ सप्टेंबर, १९२१ रोजी डॉ. आंबेडकरांनी शाहू महाराजांना लंडन होऊन एक पत्र लिहिले होते. हे पत्र अत्यंत महत्त्वाचे असून या पत्रामध्ये त्यांनी आपल्या आर्थिक अडचणी विषयी लिहिले होते. आपली आर्थिक अडचण सोडवण्यासाठी आंबेडकरांनी या पत्रामध्ये शाहू महाराजांना विनंती केली होती की, तेथील चलनव्यवस्थेचे दर कोसळल्यामुळे मला पैशाची अत्यंत निकड निर्माण झाली आहे. यासाठी मला 200 पौंडाची आवश्यकता आहे. तरी सदरचची रक्कम मला आपण कर्ज म्हणून दिल्यास मी भारतात परत आल्यानंतर सदर रक्कम व्याजासहित परत करीन. अशा स्वरूपाची ग्वाही आंबेडकरांनी शाहू महाराजांना दिली होती.[९] त्याचबरोबर या पत्रामध्ये त्यांनी भारतातील सामाजिक लोकशाहीच्या चळवळीचे आधारस्तंभ म्हणून शाहू महाराजांचा गौरव केलेला दिसून येतो.[१०]

याशिवाय, डॉ. आंबेडकरांनी लंडनहून शाहू महाराजांना लिहिलेल्या आणखीन एका पत्रामध्ये आर्थिक मदतीची अपेक्षा व्यक्त केली होती. त्यामध्ये ते म्हणतात की, मला भारतात परतण्यास विलंब होणार असल्याकारणाने माझ्या कुटुंबाची आर्थिक अडचण होणार आहे. त्यामुळे आपण ७५० रुपयांची मदत करावी. अशी विनंती केली होती. त्या विनंतीस मान देऊन शाहू महाराजांनी रुपये ७५० ची मदत केल्याचे दिसून येते.[११] पुढे जेव्हा छत्रपती शाहू महाराज यांच्या निधनाची वार्ता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समजली. तेव्हा त्यांनी दुखवट्याचा संदेश देणारे पत्र दि. १० मे, १९२२ रोजी छत्रपती राजाराम महाराज यांना पाठवलेले होते. त्यामध्ये ते म्हणतात की, वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली महाराज साहेबांच्या निधनाची वार्ता वाचून मला धक्का बसला. या संकटाच्या घटनेने मला दुहेरी दुःख झाले आहे. त्यांच्या मृत्यूने मी माझा एक वैयक्तिक मित्र, स्नेही गमावला आहे. आणि दलित समाज त्यांच्या एका महान हितचिंतकला मुकला आहे. अशा पद्धतीची भावना आंबेडकरांनी व्यक्त केली होती. [१२]

**बहुजनांच्या चळवळी विषयीचा संवाद:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज यांची भेट तशी फार कमी झालेली होती पण बहुजन वर्गाच्या चळवळीच्या अनुषंगाने दोघांच्यामधील संवाद मात्र सतत निरंतर सुरू असल्याचा दिसून येतो.

दि. ३ फेब्रुवारी, १९२१ रोजी डॉ. आंबेडकरांनी इंग्लंडहून छत्रपती शाहू महाराजांना जे पत्र लिहिले होते, त्या पत्रामध्ये ते ब्राह्मणेत्तर चळवळीच्या भवितव्यासंदर्भात चर्चा करताना म्हणतात की, इंग्लंडमध्ये ब्राह्मणेतर चळवळीची बाजू मांडणारा कोणीही खंदा समर्थ नसल्याने या चळवळीविषयी ब्राह्मणवर्गांने विशेषता तिच्या हित शत्रूंनी गैरसमज पसरल्याची खंत डॉ. आंबेडकर यांनी शाहू महाराजांना बोलून दाखवली होती. तसेच आपणास भेटणाऱ्या प्रत्येक इंग्लिश व्यक्तीसमोर हिंदुस्थानातील सामाजिक, राजकीय प्रश्नाची बाजु आपण स्वतः मांडत असल्याचे कळवले होते.[१३] तर मार्च १९२० मध्ये शाहू महाराजांनी आंबेडकरांना लिहीलेल्या पत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ‘लोकमान्य’ असा उल्लेख करून संपूर्ण हिंदुस्थानातील अस्पृश्य वर्गाचे नव्हे तर समस्त मागासवर्गीय समाजाचे डॉ. आंबेडकर हे ‘लोकमान्य पुढारी’ होतील असा आशावाद व्यक्त केला होता. डॉ. आंबेडकर यांच्यावर शाहू महाराजांचा किती प्रचंड विश्वास होता. याचे हे उत्तम उदाहरण आहे. यातून महरांजांची सामाजिक आणि राजकीय दूरदृष्टी कशी होती हे लक्षात येते. या पत्राचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यात अस्पृश्यांच्याविषयी महाराजांचे खरे हृदयगत प्रकट झालेले दिसून येते.[१४] या पत्रात शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या दैनंदिन जीवनाविषयी चर्चा केलेली दिसून येते. अस्पृश्यांचा स्वतःचा सेल्फ रिस्पेक्ट नाहीसा झाला असून ते ब्राह्मण वर्गाच्या निरंकुश नोकरशाहीने दबले गेले आहेत. ‘वेठबिगारी’ आणि ‘बलुते’ सारख्या गोष्टीमुळे त्यांना विनामोबदला काम करावे लागते आहे. या सगळ्याचा परिणाम त्यांच्या एकंदरीतच जीवनमानावर झालेला आहे. त्यामुळे त्यांना यातून बाहेर

काढण्यासाठी त्यांची महार वतने खालसा करुन त्यांच्या जमिनींचे रायतवामध्ये रूपांतर करावे लागेल. तसेच शिक्षणाविषयी त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करणे किती गरजेचे आहे हे समजते.

याशिवाय, कोल्हापूर संस्थानातील महार समाजातील वतनाची काही खास व्यवस्था करण्याची योजना शाहू महाराजांच्या डोक्यात होती. त्यासाठी महार लोकांचे सहकार्य मिळवून देण्याच्या कामी आंबेडकरांनी कोल्हापूरास यावे. अशी विनंती सुद्धा त्यांनी केलेली होती. वरील संदर्भीय पत्रातील मजकुरावरून आपल्या लक्षात येते की, अस्पृश्यता निर्मूलन संदर्भात छत्रपती शाहू महाराजांची असणारी आग्रही भूमिका आणि त्यासाठी त्यांचे चाललेले प्रयत्न यातून दिसून येतात.

पुढे दि. २३ जून, १९२० रोजीच्या पत्रात शाहू महाराज यांनी डॉ. आंबेडकर यांच्या विषयी इंग्लंडमधील आपले मित्र सर अल्फ्रेड पीज यांना पत्र लिहिले होते. त्यामध्ये ते म्हणतात की, हिंदुस्थानातील ब्राह्मण ब्राह्मणेत्तर समाज यामध्ये फरक आहे. ब्राह्मणांच्या दुटप्पी व्यवहाराबाबत डॉ. आंबेडकर हे आपल्यासमोर मते मांडतील त्या संदर्भात आपण ती शांतपणे ऐकून घ्यावी. व आपल्या परीने शक्य होईल तेवढी त्यांना मदत करावी अशी विनंती केली होती.[१५] वरील संदर्भपत्रावरून लक्षात येते की, देशातील ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वाद आणि ब्राह्मणांच्याकडून कशा पद्धतीने बहुजन वर्गाचे शोषण केले जाते आहे. या विषयाची चर्चा ब्रिटिश सरकारपर्यंत बाबासाहेबांच्या माध्यमातून पोचवून बहुजन वर्गाला कशा पद्धतीने न्याय देता येईल या अनुषंगाने शाहू महाराजांचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येतात. तर दि. ८ जुलै,१९२० रोजी टिळकांनी महार ही गुन्हेगार जमात आहे असे उद्गार काढल्याचे वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले होते. त्या संदर्भात त्यांच्यावरती फौजदारी अथवा दिवाणी खटला दाखल करता येईल का? या याविषयी शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये पत्राच्या माध्यमातून चर्चा झालेली होती. त्यामध्ये शाहू महाराज म्हणतात की, खटला उभा राहू दे अथवा नाही राहू दे पण आंबेडकरांच्या नावाची चर्चा होणे महत्वाचं आहे. कारण उच्चवर्णीय ब्राह्मण नेतृत्वाशी दोन हात करणारा अस्पृश्यांचा नेता म्हणून आंबेडकरांची प्रतिमा देशासमोर यावी हाच महाराजांचा त्यातून स्पष्ट होतो.[१६] वरील संदर्भीय पत्रावरून लक्षात येते की, शाहू महाराजांना डॉ. आंबेडकर हेच बहुजन वर्गाचे 'लोकमान्य' पुढारी आहेत. ही गोष्ट सर्वांच्या लक्षात आणून द्यायची होती.

**निष्कर्ष:**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज या दोघांचे ध्येय बहुजनांचा उद्धार करणे हेच होते.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराज दोघांचे संबंध वैयक्तिक पातळीवर जिव्हाळ्याचे त्यांच्यात घनिष्ठ मैत्री होती.

३) दोघांनाही परस्पराविषयी अत्यंतिक आदरभाव असल्याचा दिसून येतो.

४) 'लोकमान्य पुढारी' असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख शाहू महाराजांनी केलेला आहे.

५)'लोकशाहीचे आधारस्तंभ' आणि अस्पृश्यांचा हितचिंतक म्हणून शाहू महाराजांचा उल्लेख आंबेडकरांनी केला आहे.

**संदर्भ:**

१)साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २०२० पृ. २२९.

२)तत्रैव, पृ. २३०

३) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती: पत्रव्यवहार आणि कायदे, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, २००७,पृ. २८-२९.

४) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१७, पृ. ९२.

५) तत्रैव, पृ. ९३.

६) साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २०२० पृ. २३१.

७) पाटील अवनीश (संपा.), राजर्षी शाहू छत्रपती विचार वेध, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०२४, पृ.५७.

८)साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २०२० पृ. २३२.

९) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१७, पृ.६६.

१०) हरेल केशव, राजर्षी शाहू महाराज यांचे राजकीय विचार, निर्मिती विचार मंच, कोल्हापूर, २००५, पृ. ३०.

११) साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २०२० पृ. १३१.

१२) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१७, पृ.६७.

१३) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती: पत्रव्यवहार आणि कायदे, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, २००७, पृ. ५९.

१४) तत्रैव, पृ. ४५.

१५) तत्रैव, पृ. ३८.

१६) तत्रैव, पृ. ४०.